# प्रेस नोट

दि.२८/१२/२०१८

**लोकसेवक पोहेकॉ/२०४२ शिवाजी काभु भांगरे, नेमणुक घारगांव पोलीस स्टेशन, जि.अहमदनगर यांना ४०००/— रुपयांची लाच स्विकारतांना रंगेहाथ पकडले.**

प्रस्तुत बातमीतील हकिगत अशी की, यातील तक्रारदार व त्यांच्या मित्राचा अपघात झाला होता. त्यामध्ये तक्रारदार यांचे मित्र मयत झाले होते. सदर प्रकरणात तक्रारदार यांचेवर कारवाई करतो असे म्हणुन कारवाई न करता, प्रकरण मिटविण्यासाठी म्हणुन यातील आरोपी लोकसेवक पोहेकॉ/२०४२ शिवाजी काभु भांगरे, नेमणुक घारगांव पोलीस स्टेशन, जि.अहमदनगर यांनी दि.१९/१२/२०१८ रोजी तक्रारदार यांच्याकडे पंच साक्षीदारासमक्ष तडजोडीअंती ८०००/— रुपये लाचेची मागणी केली व त्यापैकी ४०००/— रुपये लाचेची रक्कम आज दि.२८/१२/२०१८ रोजी घारगांव पोलीस स्टेशनचे आवारात पंच साक्षीदारासमक्ष स्वीकारली असता त्यांना रंगेहाथ पकडण्यात आले आहे.

सदर सापळा कारवाई लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अहमदनगर युनिटने केली आहे.

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अहमदनगर कार्यालयामार्फत सर्व सामान्य जनतेला आवाहन करण्यात येते की, त्यांना कोणी शासकिय नोकर शासकिय काम करुन देण्यासाठी लाचेची मागणी करत असेल तर त्यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालय, अहमदनगर येथे खालील दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा. त्यासाठी १०६४ हा निशुल्क टोल फ्रि नंबर सुरु करण्यात आलेला आहे.

| | |
|---|---|
| **कार्यालयाचा पत्ता** | **पोलीस उप अधीक्षक कार्यालय, जिल्हा मध्यवर्ती प्रशासकिय इमारत, टि.व्ही. सेंटरसमोर, सावेडी, अहमदनगर** |
| **फोन नंबर** | **०२४१—२४२३६७७** |
| **टोल फ्रि नंबर** | **१०६४** |

(श्याम पवार)
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
अहमदनगर

Scanned by CamScanner